महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील पदव्युत्तर पदवी अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः पदोन्न-१११४/प्र.क्र.१५२(भाग-१)/सेवा-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार संकुल इमारत १० वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: ३ जून, २०१९

<u>वाचा</u> १) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. पदोन्न-१११४/प्र.क्र.१५२/सेवा-२, दि. ०९.०५.२०१८
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. पदोन्न-१११४/प्र.क्र.१५२/सेवा-२, दि. ०५.०१.२०१९

शासन आदेश:-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४००) खालील पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना "जिल्हा शल्य चिकित्सक" (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) या संवर्गात संदर्भिय आदेशान्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. तथापि, पदोन्नतीने देण्यात आलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी पद रिक्त नसल्याने, तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीनुसार व प्रशासकीय कारणास्तव खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीने देण्यात आलेल्या पदस्थापनेत अंशत: बदल करुन खालील प्रमाणे सुधारीत पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व पदस्थापनेचे ठिकाण	पदोन्नतीने देण्यात आलेले पदस्थापनेचे ठिकाण	सुधारीत पदस्थापनेचे ठिकाण
१	डॉ. सुर्यकांत एन. नेवासे, वैद्यकीय अधिकारी जिल्हा रुग्णालय अहमदनगर	वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय चिमूर, जि. चंद्रपूर	वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय वरोरा, जि. चंद्रपूर
२	डॉ. श्रीकांत एल. करोडे, वैद्यकीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय तथा अनुसंधान केंद्र, नागपूर	वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय राजूरा, जि. चंद्रपूर	वैद्यकीय अधिकारी (भिषक), प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर
३	डॉ. बालाजी संतराम मुंढे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय जालना	वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय मौंदा, जि. नागपूर	अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, डागा स्मृती रुग्णालय, नागपूर

३. संदर्भामध्ये नमूद शासन आदेशातील अटी व शर्ती जशा आहेत तशाच लागू राहतील.

४ सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि कलम ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५३१११११२३१३५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.06.03 13:08:36 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३. सह संचालक, आरोग्य सेवा (अ. व प्र.) मुंबई
४. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय चंद्रपूर/नागपूर
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी अहमदनगर/चंद्रपूर/नागपूर/जालना
१०. सर्व सह सचिव/उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. संबधित अधिकारी यांना (संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे मार्फत)
१३. निवडनस्ती सेवा-२